# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ३४६ दिनांक :- १३/१२/२०२१

## वाहतुक नियमांच्या दंडाच्या रकमेत वाढ-नवीन नियमांनुसार भरावा लागणार दंड.

महाराष्ट्र शासनाने मोटार वाहन (सुधारणा) अधिनियम २०१९ ची अंमलबजावणी करण्याबाबत आदेश जारी केल्याने अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी नवीन कादयानुसार वाहतुक नियमांचे उल्लंघनाबाबत ‘इ’ चलानद्वारे दंड आकारण्याबाबत अधिसुचना लागू केलेली आहे. नवीन सुधारित वाहतुक नियमांचे उल्लंघनाबाबत दंडाच्या रक्कमेमध्ये वाढ झालेली असून दिनांक ११/१२/२०२१ रोजी मध्य रात्रीपासुन ई चलन मशिनमध्ये अदयावत करण्यात आलेले आहेत.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-यांवर दंडाच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे वाहतुक नियमांचे उल्लंघन करणा-याला आता नवीन नियमांनुसार दंड भरावा लागणार आहे.

राज्य शासनाने मोटार वाहन कायदयात दंडाच्या वाढीची अधिसुचना जारी केल्याने दिनांक १२-१२-२०२१ पासुन मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालयातील वाहतुक पोलीसांच्या ई चलान मशीनमध्ये बदल करण्यात आला आहे. त्यामुळे मिरा-भाईंदर, वसई-विरार शहरामध्ये देखील मोटार वाहन कायदयामध्ये नविन वाढ झालेली दंडाची रक्कम रविवार पासुन वाहतुक नियमांचे उललंघन करणा-या वाहनचालकांना भरावी लागणार आहे.

वाहतुक नियमांच्या सर्वच कलमांच्या दंडामध्ये (रकमेत) वाढ करण्यात आली आहे. तसेच काही कलमांमध्ये लायसन्स निलंबन व इतर अटी शर्तीमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. याबाबत सर्व नागरिकांनी सजग राहावे व वाहतुक नियमांचे पालन करावे असे आवाहन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांकडून करण्यात येत आहे.